पनवेल (प्रतिनिधी) नावडे कॉलनी फेज २ परिसर भारनियमन मुक्त करण्यासंदर्भात अनेक वेळा निवेदन देवूनसुद्धा वीज वितरण कंपनीकडून कोणतीही योग्य कार्यवाही न झाल्याने येथील भारनियमन तातडीने बंद करावे अशी जोरदार मागणी करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या भिंगारी येथील कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतलेल्या उपोषणाच्या पवित्र्यामुळे वीज वितरण कंपनीच्या पनवेल शहर विभागाचे कार्यकारी अभियंता दिलीप मेहेत्रे यांनी तीन महिन्यात भारनियमन बंद करण्यासंदर्भात कार्यवाही करणार असून विविध तक्रारींचे येत्या १५ दिवसात सोडवणूक केली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर लवकरात-लवकर कारवाई करणार असून निष्क्रीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. १५ ऑगस्टपर्यंत भारनियमन बंद झाले नाही तर पुन्हा अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देवून वीज वितरण कंपनीकडून देण्यात आलेल्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात पनवेल नगर परिषदेतील कॉंग्रेसचे गटनेते अनिल भगत, माजी बांधकाम सभापती तथा नगरसेवक मनोहर म्हात्रे, काळुंद्रे विभागीय अध्यक्ष अनेष ढवळे, नावडे फेज २ चे अध्यक्ष मदन खानावकर, सिध्दार्थ पवार, विजय चक्षर, जितेंद्र साळुंखे, बाळू भारती, भास्कर म्हस्के, सचिन कदम, दत्तात्रय चव्हाण, गोरक्ष चौगुले आदींसह शेकडो रहिवासी या आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी वीज वितरणचे उप कार्यकारी अभियंता श्याम घायतडक, उप व्यवस्थापक व्ही.एन.जितेकर, कनिष्ठ अभियंता उमेश जोशी, पी.सुरेंद्रन आदी अधिकारी उपस्थित होते.

नावडे कॉलनी फेज २ येथे सकाळी ०५ः३० ते ०८ः३०, दुपारी ११ ते २ व सायंकाळी ७ ते ९ याप्रमाणे नियमित ८ तास विजेचे भार नियमन सुरू आहे. सिडकोने निर्माण केलेल्या वसाहतीत शहरी विभागाप्रमाणे वीजदर आकारला जात आहे. सर्व रहिवाशी वेळेत वीज भरणा करीत असतानाही भारनियम केले जात असल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगून भारनियमानाबरोबरच येथील रहिवाशांचे वीज वितरणासंदर्भतील तक्रारीही सोडव्याव्यात त्याचबरोबर ज्या विभागामध्ये वीज गळती व वीज चोरी होते त्या विभागामध्ये नियमाप्रमाणे वीज देयक भरणाऱ्यांनाही भुर्दड पडतो. अशा विभागातील कार्मचारी व अधिकाऱ्यांवरही सक्त कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी वीज वितरण कंपनीकडे केली. तसेच आम्ही वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांचे समर्थन करणार नाही परंतु पूर्ण देयके भरणाऱ्या नागरिकांच्या पाठिशी ठामपणे राहू, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. यावेळी नवीन मीटर लावणे, मीटर लावून दहा-दहा महिने झाले तरी वितरण कंपनीने देयके पाठविली नाहीत, देयके भरूनही अधिकारी वीज पुरवठा खंडीत करतात, नादुरूस्त मीटर बसवले जातात, सदनिका धारकांनाही कर्मशियल देयके पाठविणे अशा तक्रारीही रहिवाशांनी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

दिलीप मेहेत्रे यांनी सांगितले की, या परिसरात लवकरच नवीन सबस्टेशन उभारले जाणार आहे, त्यामुळे १५ ऑगस्ट पूर्वीच हा परिसर भारनियमनमुक्त होणार आहे. पनवेल परिसरात सध्या १५ टक्के वीज गळती कमी झाली आहे. याबाबत कसूर करणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करून पर्यायी त्यांच्या बदल्याही करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चुकीची देयके, नादुरूस्त मीटर, अनियमित वीज पुरवठा आदी तक्रारींचा पंधरा दिवसात निपटारा करणार असल्याचेही आश्वासन मेहेत्रे यांनी दिले.